# ७. पंचनामा

(१) कोणत्याही अपघातस्थळी किंवा गुन्ह्याच्या ठिकाणी अटक, झडती, जप्ती इ. बाबत पंचनामा हा घटनास्थळीच तयार करून पंचाची सही त्याच ठिकाणी घेणे आवश्यक आहे.

(२) पंचनामा सामान्यपणे दिवसा केला पाहिजे. परंतु परिस्थिती तशी नसेल तर रात्रीही करता येईल.

(३) पंचनामा करतेवेळी दोन पंच हजर असणे आवश्यक आहे व त्यांच्या सह्या पंचनाम्यावर त्याच ठिकाणी घेण्यात याव्या.

(४) अपघातातील स्थळाच्या पंचनाम्याची प्रत शुल्क भरून नमुना 'एए' मध्ये मिळू शकते.

(५) पंचनाम्याची प्रत संबंधित इसमाने मागितली नाही तरीही ती दिली पाहिजे.